**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपीलकर्ता
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी - प्रतिनिधी - श्री. व्ही. बी. मुंडे - सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अपर जिल्हाधिकारी,परभणी - प्रतिनिधी - श्री. व्ही. बी. मुंडे- सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. हाजी महंमद हाजी शुकूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. ३०.०३.२००९ रोजी प्राप्त झाला व माहिती उपलब्ध असून प्रतिपृष्ठ `२/- चा भरणा करावा, असे दि. २४.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले आहे. त्याचप्रमाणे करारनाम्याची प्रत त्रयस्थपक्षाकडून उपलब्ध करुन घेऊन देण्यात येईल, असेही कळविले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. त्यानंतर घाऊक व अर्धघाऊक विक्रेत्यांकडून माहिती प्राप्त करुन संपूर्ण माहिती दि. ०८.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आली आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २९.०५.२००९ रोजी अपिलार्थीस जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी सात दिवसांच्या आत उर्वरित माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय दिला होता.त्यानुसार अपिलार्थीस विनाशुल्क माहिती देण्यात आली. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, रा. मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड, नांदेड
२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,<br>बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सचिन सोमनाथ रहाटकर,<br>रा.लोहा, जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, जि.नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२११० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पु),तहसील कार्यालय, लोहा,जि.नांदेड- प्रतिनिधी - श्री. सी.के.पारेख, अ.का. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, लोहा, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २५.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली एकूण दहा मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली आहे व त्याबाबतची पोच जन अपिलीय अधिकारी

यांना देण्यात आली आहे. आयोगासमोर अपिलार्थीची दि. २७.०८.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा तहसीलदार, लोहा यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत आहे. या पत्रामध्ये एक ते दहा या मुद्यांवरील माहिती प्राप्त झाली आहे, असे नमूद केले आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सचिन सोमनाथ रहाटकर, मु.पो.देऊळगल्ली,लोहा, ता.लोहा, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु),तहसील कार्यालय, लोहा,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रामकिशन भाऊराव क्षीरसागर,<br>रा.आडगाव (बोरगाव),ता.लोहा, जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी,सजा आडगाव, ता. लोहा, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, लोहा, जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी, सजा आडगाव, ता.लोहा, जि.नांदेड- श्री. मुसा बेग खाजा बेग | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, लोहा, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ (मुंबई कार्यालयास प्राप्त)<br>दि. २८.१०.२००९ (औ.बाद कार्यालयास प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे व ती त्यांनी तहसीलदार, लोहा यांच्याकडे दि. ०९.०६.२००९ रोजी सादर केली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा अनुपस्थित आहेत. त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे याबाबत जन माहिती अधिकारी सुनावणीमध्ये सांगू शकले नाहीत. याकरिता तहसीलदार, लोहा, जि.नांदेड यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित संपूर्ण माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, जि.नांदेड यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामकिशन भाऊराव क्षिरसागर, रा. आडगाव (बोरगाव), ता.लोहा, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा आडगाव, ता.लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे,<br>रा.लोणी खुर्द, ता.अर्धापूर, जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२११२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड - प्रतिनिधी - श्री. डुकरे, नायब तहसीलदार (पु) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०६.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात दि. ०६.०५.२००९ व २२.०६.२००९ रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या

युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांना मुद्दा क्र. १ बाबत सन २००० ते २००९ या कालावधीत दप्तर तपासणी केल्याच्या अहवालाच्या प्रती तसेच मुद्दा क्र. २ बाबत श्री. नारायण बनाजी लखे, रा.धनज यांचे नावाची जमीन गट क्र. ५ व ४० या शेतीच्या नोंदवहीमध्ये फेरफार करुन ७/१२ मध्ये इतर अधिकारात जी नोंद घेतली, त्या नोंदीबाबत सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती हव्या आहेत.

या प्रकरणी जिल्हाधिकारी, नांदेड यांना स्वतः लक्ष पुरवावे लागेल व जन माहिती अधिकारी सदरच्या माहितीच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य देतील, याची व्यवस्था करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय,मुदखेड अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील, याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे, रा. लोणी खुर्द, ता. अर्धापूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय,मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संदीप हरिभाऊ पडलवार,<br>रा.अमीनगुडा, ता.माहूर, जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सा.बां.उपविभाग माहूर, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सा.बां.विभाग भोकर, जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२११३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग माहूर, जि.नांदेड- श्री. आर. आर. माछवत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम भोकर विभाग, जि.नांदेड - प्रतिनिधी - श्री. व्ही. बी. गहेरवार, उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये एकंदर २१ मुद्यांवर माहूर उपविभागातील विविध कामांसंदर्भात सन २००६-०७ या दोन वर्षांच्या कालावधीची विस्तृत स्वरुपात माहिती मागितली आहे. या माहितीपोटी एकंदर `२०,०००/- इतक्या शुल्काचा भरणा करावा, असे जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग माहूर यांनी अपिलार्थीस दि. १५.०१.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण २२ मुद्यांपैकी प्रत्येक मुद्यासंदर्भातील पृष्ठासाठी स्वतंत्र शुल्क स्वीकारावे त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीची पाहणी करण्यासाठीसुध्दा विनंती करावी. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते, असे कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.इतक्या मोठया प्रमाणावर विस्तृत स्वरुपाची व जास्त कालावधीची माहिती मागणे व्यवहार्य नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी मुद्देनिहाय शुल्क भरणा करुन माहिती घेणे किंवा उपरोक्त माहिती पाहणीसाठीचा विकल्प प्रथम अपिलावर निर्णय देताना दिलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती शुल्क भरुन किंवा माहितीची पाहणी करुन प्राप्त करुन घेणे अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असे सांगितले की, तदनंतर अपिलार्थी यांनी त्यांचे कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही.तसेच अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितलेली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संदिप हरीभाऊ पडलवार, अमिनगुडा, पो.तुळशी, ता. माहूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग

माहूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम भोकर विभाग, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा,<br>रा. नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ किनवट, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- उप विभागीय अभियंता अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, किनवट, जि.नांदेड - श्री. आर.डी. वडगावकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड - प्रतिनिधी - श्री. व्ही. बी. जहेरवार, उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.११.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.०१.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०२.२००९<br>(फेरसादर दि.१७.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी किनवट उपविभागातील शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्या नावावर दिलेल्या मोजमापपुस्तिकेची माहिती मागितली आहे व त्याकरिता अपिलार्थी यांनी विशिष्ट प्रपत्र दिले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, ती माहिती देणे अभिप्रेत आहे. तसेच त्यांनी दि. १९.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या उपविभागात उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ०३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे की, उर्वरित मोजमाप पुस्तिकेमधील माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत देण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये पुढे असेही सांगितले की, त्यावेळी इतर मोजमापपुस्तिकांची माहिती देण्यात आली नाही व जेवढी माहिती उपविभागाकडे उपलब्ध होती तेवढी देण्यात आली आहे. येथे आयोग असे सूचित करीत आहे की, कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात मोजमापपुस्तिकांचे रजिस्टर लेखा शाखेत उपलब्ध असते, त्याची अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या तारखेची म्हणजे दि. २७.१०.२००८ रोजीची परिस्थिती कळविण्याकरिता संबंधित रजिस्टरमध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या तारखेस किनवट उपविभागातील मोजमापपुस्तिकेच्या माहितीच्या रजिस्टरमधील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील घर क्र. ९-६-२२०, उमर कॉलनी मस्जीद समोर, देगलूर रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गंगाधर दिगंबर बडूरे,<br>रा. बरबडा, ता. नायगाव (खै),जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, देगलूर, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, देगलूर, जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- कृषि अधिकारी (तां.), तालुका कृषि कार्यालय, देगलूर, जि.नांदेड- श्री. एस.एम.निटुरकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, देगलूर, जि.नांदेड - श्री. एम.एस.पोले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०४.२००९ (फेरसादर दि.१८.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी देगलूर तालुक्यातील दि. ०१.०१.२००६ ते डिसेंबर २००८ या कालावधीची गतिमान

पाणलोटमधील कामाची एकूण ९ मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दि. ०४.०१.२०११ रोजीचे तालुका कृषि अधिकारी, देगलूर यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांनी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठाकडे दि. २३.०३.२००९ रोजी केलेल्या द्वितीय अपीलाच्या संदर्भातील मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती प्राप्त झाली असून द्वितीय अपिलासंदर्भात काही तक्रार नाही, असे नमूद केले असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रे यावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गंगाधर दिगंबर बडुरे, मु.पो. बरबडा, ता.नायगाव(खै), जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी (तां.), तालुका कृषि कार्यालय, देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जगन्नाथ भिमान्ना वारद<br>रा. नांदेड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक भूमी अभिलेख, अहमदपूर, जि. लातूर - श्री. एम. झेड. अशरफ (सध्याचे),श्री. डी. व्ही. सर्जे (तत्कालीन) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक भूमी अभिलेख, लातूर - श्री. सुं.पं.शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.०३.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०४.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत, त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी

तथा अधीक्षक,भूमी अभिलेख लातूर यांनी आयोगापुढे त्यांच्या युक्तिवादात अपिलार्थीच्या द्वितीय अपिलामध्ये नमूद केलेल्या मुद्यांबाबत खालीलप्रमाणे खुलासा केला.

१) दि. १५.०४.२००५ व १६.०४.२००५ रोजी मोजणी केली आहे त्याची नक्कल अपिलार्थी मागत आहेत व ती त्यांना दि. २०.०१.२००९ रोजी देण्यात आली आहे.

२) अतिक्रमणाबाबत तहसीलदार यांच्या निदेशानुसार तालुका निरीक्षक यांनी सर्वेक्षण करुन नकाशा दिला आहे.यामध्ये अपिलार्थीच्या जमिनीचा अंतर्भाव आहे.

३) मुद्दा क्र.३ माहितीवजा आहे.

४) मुद्दा क्र.४ मध्ये अपिलार्थीने माहिती नमूद केली आहे.

५) मुद्दा क्र.५ बाबत असा खुलासा करण्यात येत आहे की, अपिलार्थीने संदर्भित केलेली माहितीचा वर नमूद केल्याप्रमाणे दिलेल्या नकाशामध्ये समावेश आहे.

६) मुद्दा क्र.६ बाबत जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्टीकरण दिले की, अतिक्रमणाबाबत मोजणी करण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या जमिनीची मोजणी ही त्यांच्या वैयक्तिक जागेची असल्यामुळे त्यांनी रितसर अर्ज करुन शुल्क भरुन तदनंतर त्यांनी त्यांच्या जागेची मोजणी करुन घेणे अभिप्रेत आहे.

७) मुद्दा क्र. ७ बद्दल जन अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, गावनकाशा अपिलार्थी यांना यापूर्वी दिलेला आहे.तथापि पुन्हा टिपणाच्या प्रतीसह संपूर्ण क्षेत्राचा नकाशा मोजणी करुन देण्यात येईल.

८) मुद्दा क्र.८ माहितीवजा आहे. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांचे भाष्य नाही.

या सर्व बाबी विचारात घेता या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांना पुढील कार्यवाही करावी लागेल.

१) अपिलार्थीच्या सर्वेनंबरच्या टोचनकाशाची टिपण व गावनकाशाची अखंड प्रत विनामूल्य पुरवावी लागेल.

२) अपिलार्थीच्या संपूर्ण जमिनीच्या मोजणीसाठी रितसर अर्जाची वाट न पाहता, मोजणीबद्दलच्या शुल्काचा तपशील कळवावा लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख अहमदपूर, जि.लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहितीच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. तसेच आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत ही बाब पूर्णत्त्वास जाईल याची खातरजमा जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर यांनी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जगन्नाथ भिमान्ना वारद,द्वारा श्री. बी.जे.वारद, राधिकानगर (सरपंचनगर), ॲड.पांडे यांच्या बाजूस, तरोडा (खुर्द), मालेगाव रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक भूमी अभिलेख, अहमदपूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. उत्तम गणपतराव कदम,<br>रा.धनेगाव, ता.जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, नांदेड | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उत्तम गणपतराव कदम | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.०२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६.०५.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०७.२००९<br>(फेरसादर दि.०८.१२.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची गंभीर दखल आयोग घेत आहे. जिल्हाधिकारी, नांदेड यांना त्यांचे अधिपत्त्याखालील सर्व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगापुढील सर्व सुनावणीच्यावेळी उपस्थित राहण्याबाबत दक्ष राहण्यास कळवावे लागेल.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, ते एक माजी सैनिक आहेत. त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांनी शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, दि.१५.०१.२००६ च्या अपर जिल्हाधिकारी, नांदेड व जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांना उद्देशून लिहिलेल्या अपिलार्थी यांच्या संदर्भातील केरोसीन परवाना मान्यतेबाबतच्या पत्राबाबत माहिती मागितली आहे. अपिलार्थी स्वतः माजी सैनिक असल्यामुळे केरोसीन विक्रेता परवाना त्यांना मिळणे अभिप्रेत आहे. तथापि याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीस दि. १८.०२.२००९ रोजी कळविले आहे की, सदर माहिती तीन वर्षांपूर्वी पाठविली किंवा नाही याबाबतची मूळ संचिका उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे आपणास माहिती देता येत नाही. हीच बाब जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर निर्णय घेताना दि. ०६.०५.२००९ रोजी कायम ठेवली. प्रकरण २००६ चे - तीन वर्षापूर्वीचे आहे. त्यामुळे नस्ती उपलब्ध होत नाही, या कारणास्तव प्रकरण बंद करणे ही बाब आयोगास मान्य होत नाही. याकरिता या प्रकरणी जिल्हाधिकारी, नांदेड यांना स्वतः लक्ष घालावे लागेल व कागदपत्रे का उपलब्ध होत नाहीत, याची पडताळणी करावी लागेल. त्याचप्रमाणे अपिलार्थी माजी सैनिक आहेत,ही बाब विचारात घेता त्यांच्या अर्जाबाबत सारासार विचार करुन निश्चित निर्णयाप्रत (Logical conclusion)येणे अभिप्रेत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या मूळ अर्जामधील माहितीची संचिका उपलब्ध करुन अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवतील, असे पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम गणपतराव कदम, कौशल्यनगर, धनेगाव, ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. स. वजिर स.अहमद, : अपीलकर्ता
रा.अर्धापूर, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, अर्धापूर, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, अर्धापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद वजिर सय्यद अहमद, बरकतपूरा, अर्धापूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ताहेरोद्दीन नसीमोद्दीन मोहतसीब, : अपीलकर्ता
रा. भालदारपुरा, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक (मु.), बीड - श्री. एम. वाय टकले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०५-२००९ फेरसादर दिनांक ०९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती ही पिंपळनेर पोलीस स्टेशन, तालुका बीड येथील असल्याकरणाने ती त्यांच्याकडून मागवून घेऊन अपिलार्थीस दिनांक १९-०२-

२००९ रोजी देण्यात आलेली आहे. यावर अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडे प्रथम अपील सादर केले असता त्यावर दिनांक १९-०३-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांनी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना अपील अर्जातील मुद्दयांवर सविस्तर माहिती पुरविण्यात आलेली असून अपिलार्थीचे समाधान झालेले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी या सुनावणीस उपस्थित होते असे आयोगापुढील कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील उपलब्ध कगदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ताहेरोद्दीन नसीमोद्दीन मोहतसीब, रा. भालदारपुरा, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मु.), बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| प्रा. देशमुख हनुमंत वसंतराव,<br>व्दारा, चक्रंस निवास, अंबावेस, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कुलसचिव, शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद<br>- श्री. आय. आर. मंझा | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक, विद्यापीठ व महाविद्यालये विकास मंडळ,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा दिनांक १८-१२-२००८ रोजीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे दिनांक ३०-०१-२००९ ला प्राप्त झाला. अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक ०७-०२-२००९ ला देण्यात आली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील या प्रकरणात सादर केले. प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यामुळे अपिलार्थीस अजून एक संधी देण्यात यावी व प्रकरण निकाली काढावे असा निर्णय दिनांक २६-०२-२००९ रोजी घेण्यात आला. त्यावेळी अशीही नोंद घेण्यात आली की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविण्यात आलेली आहे. ती त्यांना प्राप्त झाल्याचा पुरावा विद्यापीठाच्या अभिलेखावर आहे असे आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि आज रोजी झालेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. प्रा. देशमुख हनुमंत वसंतराव, व्दारा, चक्रेस निवास, अंबावेस, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, विद्यापीठ व महाविद्यालये विकास मंडळ,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कैलास पोपट गजरे : अपीलकर्ता
मु. जुजगव्हाण, पो. ढेकनमोव्ह, तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग, तेलगांव, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग, तेलगांव, जिल्हा बीड - श्री. डी. डी. मिसाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०७-२००९<br>फेरसादर दिनांक<br>०५-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा दिनांक २०-०५-२००९ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक २६-०५-२००९ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जलसिंचन शाखा क्रमांक १ व २, उपविभाग लेखा शाखा, विभागीय कार्यालयातील व तांत्रिक शाखा-२ यांच्याकडून मागविण्यात आली. (जन माहिती अधिकारी यांनी ५० पृष्ठांची माहिती आयोगास दाखविली). अशा प्रकारे विविध शाखेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन दिनांक ३०-०७-२००९ रोजी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध असून ती घेऊन जावी असे कळविण्यात आले. तथापि अपिलार्थी उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यक्तिशः माहिती घेणार होते. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पुन्हा एकदा माहिती उपलब्ध असल्याबाबत नोंदणीकृत टपालाने कळवावे व ते कार्यालयात उपस्थित झाल्यास त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः माहिती देण्यात यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कैलास पोपट गजरे मु. जुजगव्हाण, पो. ढेकनमोव्ह, तालुका जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग, तेलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक भागुजी कांबळे, : अपीलकर्ता
बालाघाट कॉलनी, कॅनॉल रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अशोक भागुजी कांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, बीड - श्री. एल. बी. लोंढे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड<br>- श्री. एम. एच. चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १७-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे व ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केली. तथापि त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी सांगितले व ती न मिळालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. सन २००६-०७ या वर्षात यशवंत ग्रामसमृध्दी योजनेत ज्या कामांना मंजुरी दिलेली आहे त्या आदेशांच्या प्रती (१० गावांची माहिती अपुरी आहे ती देण्यात यावी).

२. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दिनांक ०७-०८-२००८ च्या पत्रकाची प्रत.

वरील दोनही बाबी अपिलार्थीस देय होतात.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी सांगितले की, त्यांनी अपिलार्थीस मागितलेल्या माहितीचा संपूर्ण संच दिला आहे तो अपिलार्थीने पाहणी करावा. जन अपिलीय अधिकारी यांनी असेही सांगितले की, अपिलार्थी दिनांक ०७-०८-२००८ च्या पत्राची मागणी करतात तथापि तसे पत्र त्यांच्या कार्यालयात नसून अशा प्रकारचे ०४ नोव्हेंबर २००८ चे याच विषयाचे याच संबंधीचे पत्र त्यांच्याकडे आहे व त्याची प्रत आज दिलेल्या माहितीत आहे. त्याची पाहणी अपिलार्थीने करावी. तसेच विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांच्याकडून दिनांक ०७-०८-२००८ च्या पत्राची पडताळणी करुन एक प्रत प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस पुरवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक भागुजी कांबळे, बालाघाट कॉलनी, कॅनॉल रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जीवनराव रामराव उबाळे, : अपीलकर्ता
रा. संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय. टी. आय. मागे, नगर रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १, बीड - श्री. बी. एम. चंदनशिव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १, बीड - श्री. व्ही. के. बावीस्कर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १३-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये एकंदर १६ मुद्दयांवर विस्तृत स्वरुपाची माहिती

मागितली आहे. त्यावेळी एप्रिल २००९ च्या निवडणूक प्रशिक्षणाचा कार्यक्रम असल्यामुळे त्यांच्या विभागातील सर्व कर्मचारी निवडणूक कामात व्यस्त होते त्यामुळे माहिती तयार करण्यास वेळ लागेल असे अपिलार्थीस दिनांक ०४-०५-२००९ रोजी कळविले. त्यानंतर दिनांक २९-०५-२००९ रोजी रुपये ३८ इतके शुल्क माहितीकरिता भरण्यात यावे असे कळविले. अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यानंतर दिनांक ३०-०५-२००९ रोजी अपिलार्थीस त्यावेळी उपलब्ध असलेली माहिती पाठविण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असेही नमूद केले की, उर्वरीत दोन मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक २ व ४ ची माहिती उपलब्ध नाही त्यामुळे ती देता येत नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जीवनराव रामराव उबाळे, रा. संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय. टी. आय. मागे, नगर रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग क्रमांक १, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दादासाहेब गोविंदराव जाधव, : अपीलकर्ता
मु. धोंडराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१६१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. ए. आर. आटोळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई,<br>तालुका गेवराई, जिल्हा बीड - श्री. लक्ष्मण मोतीराम पवार | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०६-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक १६-०९-२००९ रोजी देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती हस्तगत केली आहे व अपिलार्थीची पोच त्यांच्या दप्तरी अभिलेखात आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थीच्या त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांना उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दिनांक १६-०९-२००९ च्या पत्राची प्रत आयोगापुढे सादर करण्यात आली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०६-०६-२००९ च्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती मिळाली आहे असे नमूद केले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दादासाहेब गोविंदराव जाधव, मु. धोंडराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २५-०२-२००८ रोजी माहिती प्राप्त झाली आहे तथापि ती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस दिनांक २४-०४-२००७ च्या पत्रान्वये रुपये ३०० चा भरणा करावा असे कळविण्यात आले. तेव्हा तात्काळ दिनांक १४-०५-२००७ रोजी त्यांनी रुपये ३०० चा भरणा केलेला आहे. तथापि त्याच पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे की, शासनाकडून आवश्यक निधी प्राप्त झाल्यानंतर आपणास माहिती देण्यात येईल ही बाब चुकीची आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन खालील बाबी आढळून येतात.

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०४-२००७ रोजी दिलेल्या पत्राव्दारे रुपये ३०० चा भरणा करावा व त्याप्रमाणे शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर आपणास माहितीच्या प्रती देण्यात येईल असे कळविले आहे ही बाब योग्य नसून ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा भंग करणारी आहे. याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर यांना सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे मार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल.

२. आवश्यक त्या रकमेचा अपिलार्थीने भरणा केल्यानंतर सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुमारे ३०० दिवस उशिराने माहिती दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केला आहे. याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर तसेच त्यांचे या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन अधिकारी / कर्मचारी हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) अन्वये एकत्रित रुपये २५,००० शास्तीस पात्र होत आहेत. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सचिव, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन कार्यकारी अभियंता / उप अभियंता व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्यावर तामील करावयाची जबाबदारी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर यांची राहील.

३. अपिलार्थी यांना जी माहिती मिळाली आहे ती अपिलार्थी यांचे म्हणणे आहे की, अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर यांना अपिलार्थीने

मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२. वर नमूद केल्याप्रमाणे प्रकरण योग्य प्रकारे न हाताळल्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झ ाला आहे. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सचिव, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन कार्यकारी अभियंता / उप अभियंता व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्यावर तामील करावयाची जबाबदारी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर यांची राहील.

३. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्विकारलेले रुपये ३०० अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत परत करावेत.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भास्करराव नारायणराव लहाने, मु. पो. भाग्यनगर, नांदेड रोड, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भालेराव रविंद्र गोविंद,<br>प्लॉट नं. ९६, तुळजापुरे नगर, मळवटी रोड, नांदेड नाका, तालुका जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई-०१ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई-०१ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई-०१ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई-०१ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | १७-०९-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निर्णयावर तारीख नाही |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-१२-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणामध्ये त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास जरुरीचे वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भालेराव रविंद्र गोविंद, प्लॉट नं. ९६, तुळजापुरे नगर, मळवटी रोड, नांदेड नाका, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई-०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई-०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बापुराव निवृत्ती काळे, : अपीलकर्ता
पोलीस निरीक्षक, नियंत्रण कक्ष,
उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पोलीस उप अधीक्षक कार्यालय,
उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी (गृह), उस्मानाबाद<br>-प्रतिनिधी - श्री. अ. सत्तार इस्माईल शेख, पोलीस निरीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद<br>-प्रतिनिधी - श्री. अ. सत्तार इस्माईल शेख, पोलीस निरीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०९-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२३-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०१-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये सन १९८८ ते २००९ या कालावधीतील त्यांच्या स्वतःच्या वार्षिक गोपनीय अहवालाच्या सत्यप्रतीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मु.), उस्मानाबाद यांनी ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नियम क्रमांक ८ (त्र) नुसार देण्याचे नाकारले आहे व ही बाब अपिलार्थीस दिनांक ३१-०७-२००९ रोजी कळविण्यात आली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन माहिती अधिकार अधिनियम २००२ ची अंमलबजावणी करताना जन माहिती अधिकारी यांना दिनांक १६-१०-२००५ च्या परिपत्रकाव्दारे मार्गदर्शन करण्यात आले असून यामध्ये या कलम ७ (च) चा उल्लेख केला आहे. अशा प्रकारचे मार्गदर्शनपर परिपत्रक शासनाने माहिती अधिकार अधिनियम २००५ नंतर काढल्याचे आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) मधील उपकलम ङ अन्वये गोपनीय अहवाल हे अपिलार्थीस देय होत नाहीत त्याचप्रमाणे ते देता येणार नाहीत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बापुराव निवृत्ती काळे, पोलीस निरीक्षक, नियंत्रण कक्ष, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी (गृह), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोटे अशोक नामदेवराव, : अपीलकर्ता
मु. पो. पारगांव, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जामखेड महाविद्यालय, जामखेड, तालुका जामखेड,
जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी, :
जामखेड महाविद्यालय, जामखेड, तालुका जामखेड,
जिल्हा अहमदनगर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोटे अशोक नामदेवराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, जामखेड महाविद्यालय, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, जामखेड महाविद्यालय, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी जामखेड महाविद्यालय, जामखेड, जिल्हा अहमदनगर या महाविद्यालयातील स्वतःची दोन मुद्दयांवर वैयक्तीक माहिती शैक्षणिक सत्र १९९२ ते ९७ या कालावधीची मागितली आहे. त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी त्यांना सेवापुस्तकाची प्रत मिळालेली आहे. तथापि उर्वरीत माहिती मिळालेली नाही. याबाबत रुपये तीसचा भरणा करा असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. त्यानुसार त्यांनी रुपये तीस चा डी. डी. दिनांक १०-१०-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला. यानंतरही त्यांना उर्वरीत माहिती मिळाली नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास असेही अवगत केले की, सेवा पुस्तक व प्रमाणपत्रे यामध्ये त्यांना तफावत आढळून आली आहे. तफावत दुरुस्त करावी म्हणून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रुपये तीस चा भरणा केला आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन तसेच अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन आयोगास असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, जामखेड महाविद्यालय, जामखेड यांनी अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या माहितीमध्ये त्रुटी असल्याची नोंद घेतली असून माहिती दुरुस्त करुन पुरविण्यासाठी रुपये तीसचा भरणा करावा असे दिनांक २२-०९-२००९ रोजी कळविले आहे व त्यानुसार अपिलार्थीने दिनांक १०-१०-२००९ रोजी भरणा केल्याचे दिसून येते. या प्रकरणात जन माहिती अधिकारी / जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून विलंब झाला असल्याकारणाने सह संचालक, उच्च व तंत्रशिक्षण, पुणे विभाग, पुणे यांना जन माहिती अधिकारी /जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून वर नमूद केल्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

सह संचालक, उच्च व तंत्रशिक्षण, पुणे विभाग, पुणे यांनी जन माहिती अधिकारी /जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून वर नमूद केल्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोटे अशोक नामदेवराव, मु. पो. पारगांव, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, जामखेड महाविद्यालय, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जामखेड महाविद्यालय, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सह संचालक, उच्च व तंत्रशिक्षण, पुणे विभाग, पुणे, १७, आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे - ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अब्दुल लतीफ अब्दुल मजीद,<br>७७१, मजीद व्हिला, रसुलपुरा, उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टँड जवळ, सिडको, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टँड जवळ, सिडको, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टँड जवळ, सिडको, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टँड जवळ, सिडको, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. निमसरकार, श्री. अय्यर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-१२-२००९ मुंबई |

कार्यालयाकडे
प्राप्त,
०२-०१-२०१०
औरंगाबाद
कार्यालयाकडे
प्राप्त

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणामध्ये त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास जरुरीचे वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २२-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल लतीफ अब्दुल मजीद, ७७१, मजीद व्हिला, रसुलपुरा, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टँड जवळ, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिडको बसस्टँड जवळ, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अमोल शहाजी पाटील, : अपीलकर्ता
रा. इनगोंदा, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मंडळ कृषि अधिकारी, अनाळा, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९३२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अमोल शहाजी पाटील | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषि अधिकारी, अनाळा, तालुका परंडा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०१-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १६-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २७-०४-२००९<br>फेरसादर दिनांक<br>०७-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मौजे इनगोंदा, तालुका परंडा येथील त्यांच्या शेतामधील जमीन गट नंबर १४९ मधील नालाबंडिग बाबतची चार मुद्दयांवर माहिती मागितली आहे ती खालीलप्रमाणे आहे.

१. सदरील नाल्याच्या बांधकामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक व त्यावर झालेल्या खर्चाच्या तपशीलाच्या झ ेरॉक्स प्रती

२. नाल्याचे काम पूर्ण झाल्याबाबतच्या तपशीलाची कागदपत्रे, झालेल्या कामाच्या प्रती व राहिलेल्या कामाच्या तपशीलाच्या प्रती

३. नाल्याच्या कामाचे अंदाजपत्रक व केलेल्या पिचिंगच्या कामाची कागदपत्रे

४. मजुरांच्या हजेरीपत्रकांच्या व पगारपत्रकांच्या प्रती

सदरील माहिती ही अपिलार्थी यांना देय होत आहे. ती त्यांना जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. तसेच माहिती न पुरविल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, अनाळा, तालुका परंडा हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) अन्वये शास्तीस पात्र होत आहेत. त्याकरिता मंडळ कृषि अधिकारी, अनाळा, तालुका परंडा यांना रुपये २५,००० शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सह संचालक (कृषि), लातूर विभाग, लातूर यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, अनाळा, तालुका परंडा यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२.	मंडळ कृषि अधिकारी, अनाळा, तालुका परंडा यांना रुपये २५,००० शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सह संचालक (कृषि), लातूर विभाग, लातूर यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमोल शहाजी पाटील, रा. इनगोंदा, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, अनाळा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सह संचालक (कृषि), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शाहुराज खंडेराव खोसे,<br>रा.लोहटा (प), ता. कळंब, जि.उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब,<br>जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, भूम, जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २२-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शाहुराज खंडेराव खोसे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, कळंब, जि.उस्मानाबाद-श्री. डी.एच.राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती सन १९८५-९० या कालावधीची आहे. संबंधित

संचिका शोधण्यासाठी वेळ लागणार आहे, असे अपिलार्थीस दि. १६.०४.२००९ रोजी कळविण्यात आले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेऊन दि. २५.०७.२००९ रोजी अपिलार्थीस पंधरा दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास हेही अवगत केले की, संबंधित संचिकेचा शोध घेऊनही संचिका सापडत नाही. तथापि असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांचा अर्धघाऊक विक्री परवाना रद्द केल्याची सद्यपरिस्थिती - जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यामार्फत परवाना रद्द केल्याचे आदेश निघत असल्यामुळे - ही प्रत त्यांच्याकडून प्राप्त होऊ शकेल. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, ते अर्धघाऊक केरोसिन परवानाधारक होते व त्यांचा परवाना रद्द झाल्याचे अवगत झाले नाही, त्यामुळे त्यांना ही प्रत आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिलार्थीस ही माहिती देय होत आहे. तहसीलदार, कळंब यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,उस्मानाबाद यांना दि. ११.११.२०१० रोजी या प्रकरणासंदर्भात एकूण ८ मुद्यांवर माहिती कळविली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर आयोग जिल्हा पुरवठा अधिकारी (श्री. डी.बी.जायभाय) यांना अपिलार्थीच्या विचाराधीन मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी म्हणून जाहीर करीत आहे व अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या सत्यप्रती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्या लागतील.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद (श्री.डी.बी. जायभाय) यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या सत्यप्रती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शाहुराज खंडेराव खोसे, रा. लोहटा (प), पो. करंजकल्ला, ता.कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.),तहसील कार्यालय, कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळंब,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किरण माणिकराव यादव,<br>रा.आराधवाडी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पुरवठा अधिकारी (नायब तहसीलदार), लोहारा,<br>जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, लोहारा, जि.उस्मानाबाद | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९२२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २१.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या दि. २१.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहारा, जि. उस्मानाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तहसीलदार, लोहारा, जि. उस्मानाबाद अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२१.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २२-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव,रा. आराधवाडी तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.), तहसील कार्यालय, लोहारा,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहारा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. देवराव बंडू पारधे,रा. औरंगाबाद. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद - श्री. वा. ना. देशपांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद - डॉ. अ.रा.थेटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०६.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १३.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये दै.गावकरी, दि. १०.०५.२००६ मधील जाहीरातीनुसार २९ पदे भरली आहेत काय व भरली नसल्यास केव्हा भरणार, याबाबत विचारणा केली आहे. अपिलार्थी यांचा हा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष दि.

२८.०५.२००८ रोजी प्राप्त झालेला आहे. यासंदर्भात दि. ०३.०६.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे व संपूर्ण २९ पदांची भरती केली आहे व जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदांपैकी कोणतीही पदे रिक्त नाहीत, असे कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने दि. ११.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यासंदर्भात तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय यांनी अपिलार्थीस दि. ०२.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सविस्तर कळविलेले आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्रूटी आढळून येत असेल तर तसे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावे लागेल व तदनंतर पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जास अनुसरुन अपिलार्थीस माहिती पुरवावी लागेल. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांना वर नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी कळविल्यास अपिलार्थीस माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक महिन्याच्या आत पाठवावी लागेल.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २३-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देवराव बंडु पारधे, एन-७, बी-१,९३,सिडको, औरंगाबाद - ४३१ ००३

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पांडुरंग रामराव जिवरग, : अपीलकर्ता
रा. निमखेडा, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी,
सजा गेवराई (पायगाव),ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, फुलंब्री, जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही पक्षाची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. त्याचप्रमाणे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीस अनुपस्थित राहण्याच्या कृतीद्वारे त्यांचे माहिती अधिकार अधिनियम,२००५ च्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष होत असल्याची गंभीर बाब आयोगाच्या निदर्शनास आली आहे. सबब पुढील सुनावणीच्यावेळी संबंधित जन माहिती व

अपिलीय अधिकारी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहतील हे जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना पहावे लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग रामराव जिवरग, रा. निमखेडा,पो. कायगाव, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी,सजा गेवराई (पायगाव),ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद - डॉ. म. मोहिनोद्दीन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद - डॉ. एन.सी. वैष्णव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.१०.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती एकूण ४८० पृष्ठांमध्ये दि. १४.०८.२००९ रोजी देण्यात आली आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली. तथापि त्यांचे म्हणणे

असे आहे की, त्यांना समाधानकारक माहिती मिळालेली नाही व त्यांना मिळालेली ही माहिती खोटी आहे. यावर आयोगाने सूचित केले की, या बाबत अपिलार्थी योग्य प्राधिकरणाकडे स्वतंत्रपणे तक्रार दाखल करु शकतात.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर,द्वारा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त औरंगाबाद, खडकेश्वर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक सर्जेराव मगर, : अपीलकर्ता
रा. हिवरखेडा, ता.कन्नड,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,बांधकाम भवन, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विशेष अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद- श्री. चंद्रशेखर प्रभाकर जोशी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, जन माहिती अधिकारी तथा विशेष अधीक्षक, सा.बां.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी दि. ०९.०७.२००९ रोजी माहितीच्या संदर्भात अपिलार्थीस कळविले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर घेतलेल्या सुनावणीमध्ये स्पष्ट केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी दोन मुद्यांवर (मुद्दा क्र.१ व ३) चौकशी संदर्भातील माहिती चौकशी अहवालाशी संबंधित असल्यामुळे व ही चौकशी प्रगतीपथावर असल्यामुळे त्यासंदर्भातील माहिती त्यांना सध्या देय होत नाही. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. २ ची माहिती विधानमंडळातील प्रश्नोत्तरासंबंधीची असल्यामुळे ही माहिती शासनस्तरावर व विधानमंडळात छापील स्वरुपात उपलब्ध आहे व प्रादेशिक विभाग कार्यालयात उपलब्ध नसल्याने तसेच त्यांच्या धारिकेत नसल्यामुळे ती देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले आहे.या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळण्यात आले होते. तसेच आज रोजी या परिस्थितीत कोणताही बदल नाही,असेही त्यांनी आयोगास पुढे त्यांच्या युक्तिवादात सांगितले.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक सर्जेराव मगर, रा. हिवरखेडा, पो. वडाळी, ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रकाश एस.पाटील, | : | अपीलकर्ता |
| रा. औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, परभणी | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१७५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | प्रपत्र 'अ' नाही. |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २४.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रतिनिधीमार्फत कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही म्हणून पुढील तारीख देण्यात यावी अशी दि. २३.०३.२०११ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास विनंती केली आहे. सदर विनंती मान्य करण्यात येत असून प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश एस.पाटील, रा. निलकंठ अपार्टमेंट, रेल्वेस्टेशन रोड, आर. टी. ओ. ऑफीसच्या बाजूस, गोळेगावकर कॉलनी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,तहसील कार्यालय,भोकरदन,<br>जि.जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन, जि.जालना - श्री. एस.ए.चाऊस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, भोकरदन, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | उपविभागीय अधिकारी,जालना - प्रतिनिधी - श्री.एन.वाय.दांडगे, अव्वल कारकुन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०५.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी,भोकरदन यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मौजे कोलते पिंपळगाव येथील एकूण २९ स्वातंत्र्य सेनानीच्या वारसाच्या फेरफारच्या नकला व ७/१२ च्या नकला मागितलेल्या आहेत. अपिलार्थीने ही माहिती मागताना संबंधित स्वातंत्र्यसैनिकांच्या गट क्रमांक व फेरफार क्रमांकांचा उल्लेख केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांच्या संगणकामध्ये गट क्रमांक व फेरफारनिहाय माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे गट क्रमांक व फेरफार क्रमांक उपलब्ध झाल्यास अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भित मुद्याबाबत व्यक्तीनिहाय माहिती देणे शक्य होईल. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, त्यांनी ही बाब अपिलार्थीस दि. ०३.०३.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे. यावर अपिलार्थीचा प्रतिसाद त्यांना प्राप्त झाला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दिलेल्या साक्षीनुसार अपिलार्थी यांनी गट क्रमांक व फेरफार क्रमांक दिल्यास ही माहिती त्यांना त्वरित मिळू शकेल. हे शक्य नसल्यास अपिलार्थी यांनी २९ स्वातंत्र्यसैनिकांपैकी नेमक्या काही स्वातंत्र्यसैनिकांबाबत संदर्भ केल्यास जन माहिती अधिकारी त्यासंदर्भातील माहितीचा शोध घेऊन अपिलार्थीस देऊ शकतील. तरी अपिलार्थी यांना सदरची बाब जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत कळवावी लागेल व तदनंतर त्यासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस त्वरित द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीकडून संदर्भ प्राप्त होताच तदनंतर पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती द्यावी. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय जनार्धन तिखे पाटील,<br>रा. शिंगी, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>कन्नड, जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, कन्नड, जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषी अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,कन्नड,जि.औरंगाबाद- श्री. ए.एस. कोंडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, कन्नड, जि.औरंगाबाद - श्री. व्ही.के. पालीमकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०८.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०६.२००९<br>(फेरसादर दि.१३.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये सन २००५ ते २००८ या वित्तीय वर्षात कन्नड तालुक्यामधील शेतकऱ्यांना फळबाग वाटप करण्याबाबत तसेच गांडुळखत,शेततळे व नालाबंडींग ,नदी-खोरे यांच्या अंतर्गत गतीमान पाणलोट इत्यादीबाबत विस्तृत अशी माहिती मागितलेली आहे. माहिती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ११.०८.२००८ रोजी अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याचा निर्णय दिला आहे. अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्यात आली आहे व अपिलार्थीची याबाबतची पोचपावती त्यांच्या दप्तरी दाखल आहे.आयोगासमोर केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती देण्यात आली असल्याचे व त्याची पोच दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी तालुका कृषि अधिकारी यांना दिल्याचे आढळून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय जनार्धन तिखे पाटील, मु.पो.शिंगी, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कन्नड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रकाश प्रभाकरराव सोनटक्के,<br>रा. भराडी, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, सिल्लोड,<br>जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय,<br>जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माळवे ज्ञानेश्वर मंचकराव, : अपीलकर्ता
रा. गंगाखेड, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार,गंगाखेड, जि.परभणी - प्रतिनिधी - श्री. व्ही.एस.जिंतपुरे,ना.त.(म-२) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अंशकालीन पदवीधर कर्मचाऱ्याच्या सेवाशर्तीबाबत काही माहिती मागितलेली असून यासंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रकांच्या प्रतीमध्ये उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत आहे. तथापि उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस ही

माहिती मिळालेली दिसून येत नाही. ही बाब विचारात घेता,जन माहिती अधिकारी यांना संबंधित शासन निर्णयाच्या/परिपत्रकांच्या प्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगाखेड, जि.परभणी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माळवे ज्ञानेश्वर मंचकराव, रा.नवा मोंढा, मु.पो.ता.गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सय्यद हासन पिता सय्यद बशीर,<br>रा. परभणी. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, परभणी-प्रतिनिधी- श्री. आर. के. कोलगणे, नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये एकूण ९ मुद्यांवर मागितलेल्या माहितीपैकी दोन मुद्यांवरील माहिती दि. १८.०८.२००९ रोजी देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात येऊन दि. ३०.१०.२००९ रोजी

निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांनी अपिलार्थीस आठ दिवसाचे आत विनामूल्य माहिती देण्यात यावी. त्याबरहुकूम दि. ०५.११.२००९ रोजी उर्वरित संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २९-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद हासन पिता सय्यद बशीर,रा. माळी गल्ली, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. श्रीराम सखाराम बढे,<br>रा. पैठण, जि.औरंगाबाद. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, पैठण, जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीराम सखाराम बढे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय,पैठण, जि.औरंगाबाद - श्री. जी.डी.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -तहसीलदार,पैठण, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद - प्रतिनिधी श्री. के.पी.विसपुते, अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.१०.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सध्याचे जन माहिती अधिकारी व तत्कालीन अपिलीय अधिकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना दि. ०३.११.२००९ रोजी माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी आयोगासमोर त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य केले. तथापि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ बाबत माहिती मिळालेली नाही, यामध्ये अपिलार्थीस रस्त्याबाबत केलेल्या पंचनाम्याची प्रत त्यांना प्राप्त झालेली नाही व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले आहे की, संबंधित मंडळ अधिकाऱ्याने पंचनाम्याची प्रत तहसील कार्यालयात दाखल केलेली नसल्यामुळे नक्कल देता येत नाही. तथापि अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार पंचनामा झालेला आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे निदेश असे आहेत की, तहसीलदार, पैठण यांनी पंचनामा झाला किंवा कसे याबाबतची चौकशी करावी व पंचनामा झाला असल्यास त्या पंचनाम्याची प्रत संबंधित मंडळ अधिकाऱ्याकडून प्राप्त करुन घ्यावी व पंचनामा झाला नाही, असे चौकशीत आढळले तर अपिलार्थीस त्याप्रमाणे कळवावे लागेल.ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या रस्त्याबाबत पंचनामा झाला किंवा कसे याबाबतची चौकशी करावी व झाला असल्यास पंचनाम्याची प्रत संबंधित मंडळ अधिकाऱ्याकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी व पंचनामा झाला नाही असे चौकशीत आढळले तर, अपिलार्थीस त्याप्रमाणे कळवावे.ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २९-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीराम सखाराम बढे,मु.पो.शिवनेरी, माधवनगर, ता.पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. सुनिता पाटील बाभळीकर, : अपीलकर्ता
रा. भोकर, जि.नांदेड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, हिमायतनगर, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, हिमायतनगर, जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर,जि.नांदेड - श्री. पैलवाड ना.बा. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, हिमायतनगर, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १४.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये हिमायतनगर तालुक्यातील सर्व

स्वस्तधान्य दुकानदारांनी उचललेल्या धान्याबाबत योजनानिहाय,गावनिहाय, स्वस्त धान्य दुकानदारांचा परवाना क्रमांक व ठिकाणासह विस्तृत स्वरुपाची दि.१.०१.२००८ ते १०.०७.२००९ या कालावधीचे एकूण चार मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे.

अपिलार्थी यांच्या या अर्जासंदर्भात सर्व दुकानदाराकडून माहिती मागविण्यात आली असता माहितीच्या छायाप्रती काढण्याकरिता येणाऱ्या खर्चाचा तपशील प्राप्त झाला व तो तपशील अपिलार्थीस दि. ३०.०७.२००९ रोजी कळविण्यात आला व या तपशीलासह एकूण रु. १,१२,७१२/- इतक्या रकमेचा भरणा कार्यालयात केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होईल, असे शुल्काचा भरणा करण्याच्या लेखाशीर्षासह अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. आयोगाने पृष्ठांची संख्या योग्य आहे का, अशी विचारणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सुमारे ५५००० पृष्ठांची संख्या आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी या शुल्काचा भरणा केला नाही, त्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी शुल्काचा भरणा करावा याकरिता कार्यालयात उपस्थित राहून आवश्यक असलेल्या माहितीची पहाणी घेऊन जावी,असे पुन्हा कळविण्यात आले आहे. तथापि यावर अपिलार्थीने कार्यवाही केलेली नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन आयोगास असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पुरविण्याकरिता प्रयत्न केलेला आहे व विहित मुदतीत अपिलार्थीस कळविलेले आहे. तथापि त्यास अपिलार्थीने प्रतिसाद दिलेला आढळून येत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. सुनिता पाटील बाभळीकर,देशमुख गल्ली, भोकर, जि.नांदेड

२.	जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिमायतनगर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपीलकर्ता
रा.पूर्णा, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, अंबड, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,
जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, ल.पा.(स्था.स्तर), उपविभाग अंबड,जि.जालना - श्री. एस.व्ही. पडलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी -श्री. डी.एन.गलबे, कनिष्ठ अभियंता | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १५.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या उपविभागातील रोहयोच्या कामाबाबत दि. ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ या कालावधीची विस्तृत अशी माहिती मागितलेली आहे. याकरिता अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे दि. १३.०३.२००९ रोजी कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला आढळून येत नाही. त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्त.) विभाग जालना यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात दि. २९.०४.२००९ रोजी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती जास्त असल्याने व उपविभागात मनुष्यबळ कमी असल्यामुळे ही माहिती पाहणीकरिता त्यांच्या उपविभागात तयार असून माहितीची पाहणी करण्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविलेले असल्याने प्रकरण निकाली काढले असल्याचे दिसून येत आहे.अपिलार्थीने त्यास प्रतिसाद दिलेला आढळून येत नाही व राज्य माहिती आयोगाकडे अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या संपूर्ण घटनाक्रमात अपिलार्थीस माहिती मिळालेली नाही, हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे आयोगाचे असे निदेश आहेत की, अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे कार्यालयात पाहणी करण्यासाठी पुन्हा एक संधी उपलब्ध करुन त्यातील आवश्यक काही कागदपत्रे छायाप्रतीमध्ये विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी लागेल व पाहणीबाबत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे लागेल.

या सर्व पार्श्वभूमीवर तसेच अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती पाहणीसाठी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी यापूर्वी एक संधी दिली असल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे आयोगाच्या स्तरावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली,पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ल.पा.(स्था.स्तर), उपविभाग अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. हरीश्चंद्र गोविंदराव चव्हाण,<br>रा.सातेफळ, ता.पूर्णा, जि.परभणी. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव,<br>विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्या., सातेफळ,<br>ता.पूर्णा,जि. परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जि. परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सचिव, सातेफळ वाघ विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्या. सातेफळ (वाघ), ता.पूर्णा, जि.परभणी - श्री. के.एन.सोनटक्के | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जि.परभणी - प्रतिनिधी - श्री. ए.बी.चव्हाण, सहकार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ०९.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १३.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २२.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सचिव, सातेफळ वाघ विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्या. सातेफळ, ता.पूर्णा, जि.परभणी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी स्वतःच्या कर्ज प्रकरणाबाबत माहिती मागितलेली आहे व ती माहिती त्यांना देऊ केली असता अपिलार्थी यांनी ती स्वीकारली नाही. त्यामुळे त्यांनी ही माहिती जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जि.परभणी यांच्याकडे दि. ३१.०८.२००९ रोजी पाठविली. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जि.परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०३.०९.२००९ रोजी निर्णय दिला आहे व त्या निर्णयानुसार अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती द्यावयाची आहे. त्याप्रमाणे अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जि.परभणी यांच्यामार्फत माहिती देण्यात आली आहे व त्याची पोच कार्यालयीन दप्तरी दाखल आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र गोविंदराव चव्हाण, रा. सातेफळ, ता.पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, सातेफळ वाघ विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्या. सातेफळ, ता.पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. म. ह. धारवाडकर,<br>रा.परभणी. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसचिव, महसूल व वन विभाग (कार्यासन-ई-३),<br>मंत्रालय, मुंबई | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - श्री. शांताराम सिताराम कुदळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसचिव, महसूल व वन विभाग (कार्यासन इ-३), मंत्रालय, मुंबई | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०९.२००६ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे दि. ०१.११.२००९ अन्वये द्वितीय अपील सादर केले

आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १९(३) (१) अन्वये "संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर घेतलेल्या निर्णयाविरुध्द निर्णयाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत द्वितीय अपील सादर करु शकतात. परंतु, अपीलकर्त्याला वेळेत अपील दाखल न करण्यास वाजवी कारण होते अशी यथास्थिती, केंद्रीय माहिती आयोगाची किंवा राज्य माहिती आयोगाची खात्री पटली तर, नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याला अपील दाखल करुन घेता येईल." तथापि सदर द्वितीय अपील सुमारे ४०० दिवसांच्या विलंबाने दाखल केल्याचे दिसून येते. या विलंबाकरिता समर्थनीय कारण नमूद केलेले आढळून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीचे द्वितीय अपील दाखल स्तरावर फेटाळण्यायोग्य आहे तथापि जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई हे आज सुनावणीस उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १९.०८.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये दोन मुद्यांवर मागितलेल्या माहितीपैकी गोपनीय अहवालासंदर्भातील माहितीच्या छायांकित प्रती अपिलार्थीस देण्यात आल्या आहेत. दुसरा मुद्दा - उपजिल्हाधिकारी पदावर मानीव दिनांकाबाबतची माहिती - असा असून या बाबत विभागीय आयुक्त कार्यालयाकडून कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत व ती ते अपिलार्थीस पाठवू शकतात. या सर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे असे निदेश आहेत की, जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, महसूल व वन विभाग (कार्यासन इ-३), मंत्रालय यांना उपरोक्त उर्वरित माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाच्या स्तरावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. म. ह. धारवाडकर,निवृत्त उपजिल्हाधिकारी, ३०, महसूल कर्मचारी गृहनिर्माण संस्था, शिवाजी विधी महाविद्यालयासमोर, वसमतरोड, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (कार्यासन इ-३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (कार्यासन इ-३), महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे पाथरीकर, : अपीलकर्ता
रा. पाथरी, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
अतिरिक्त जिल्हाधिकारी, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी - प्रतिनिधी - श्री.देशपांडे, तलाठी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अधिकारी अनुपस्थित आहेत. दोनही पक्षाची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते.त्यामुळे सदर

प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे पाथरीकर, रा.इंदिरानगर, पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपीलकर्ता
व्दारा, एस. के. जोनवाळ, प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद - श्री. तुपे बी. ए. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २५-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये चार मुद्दयांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी दोन मुद्दयांवरील माहिती ही सन २००५ वर्षातील व उर्वरित दोन मुद्दयांवरील माहिती सन २००८ वर्षातील आहे. मुद्दा क्रमांक ३ ची माहिती त्यांना आता प्राप्त झाली आहे व ते ती अपिलार्थीस देऊ

शकतात. ती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल तसेच मुद्दा क्रमांक १, २ व ४ मध्ये अपिलार्थी यांनी जे त्यांच्या पत्रांचे संदर्भ दिलेले आहेत ते संचिकेत उपलब्ध असल्याचे आढळून आले नाही त्यामुळे ते देता येत नाही ही बाब अपिलार्थीस कळवावी लागेल. तथापि यापूर्वी या कालावधीमधील आवक रजिस्टरमध्ये या पत्राची नोंद झाली आहे किंवा कसे याची खातरजमा जन माहिती अधिकारी यांना करुन घ्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली व अपिलार्थीस देय असलेली उपलब्ध माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, व्दारा, एस. के. जोनवाळ, प्लॉट नं. ४, प्रा. रावसाहेब ढवळे यांच्या घराजवळ, भाग्यनगर, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गणेश किसनराव अजगे,<br>कुंभार गल्ली, पाणी वेस (गंगाव्दार), नवीन जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गणेश किसनलाल अजगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०६-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ०६-०५-२००९,<br>१३-०५-२००९,<br>१९-०५-२००९,<br>२५-०६-२००९ व<br>२६-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | २४-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १०-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी दिनांक ०६-०४-२००९ रोजीच्या अर्जान्वये एकंदर १४ मुद्दयांवर जालना नगर परिषदेबाबत माहिती मागितली आहे. तथापि

एकूण १३ मुद्दयांवर माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे व मुद्दा क्रमांक १० ची माहिती प्राप्त झालेली नाही. त्याचप्रमाणे एकूण १३ मुद्दयांवर मिळालेल्या माहितीपैकी खालील माहिती अप्राप्त आहे.

१. जड वाहन चालकांच्या परवान्याबाबत माहिती : तेरा वाहनचालकांच्या परवान्याच्या प्रती व त्यांच्या नुतनीकरणाबाबतची माहिती.

ही माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश किसनराव अजगे, कुंभार गल्ली, पाणी वेस (गंगाव्दार), नवीन जालना.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विकास कुमार बागडी,<br>नाथ गल्ली, सदर बाजार, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. ए. आर. सरोदे, सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. चिखलीकर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०३-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०३-२००९ रोजी निर्णय देऊन

अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असा आदेश पारीत केला आहे. अपिलार्थीस माहिती मिळाली किंवा कसे हे सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगास सांगू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य द्याव्या लागतील अशी कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी करतील, असे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना व्यक्तिशः पहावे लागेल.

प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आतापर्यंत माहिती पुरविलेली नाही तसेच आयोगासमोर सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील अटी व नियमांचे पालन करण्यात कसूर केली आहे, असे आयोगास आढळून येत आहे. याव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० (१) अन्वये रुपये २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत झाले आहे व त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना तामील होईल, असे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना पहावे लागेल. या सर्व बाबी पाहता, सचिव, जलसंपदा यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) अन्वये शिफारस करण्यात येतआहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्र छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२. अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पुणे यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन कार्यकारी अभियंता / उप अभियंता व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्यावर तामील करावयाची जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची राहील.

३. सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विकास कुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, म. रा. पुणे, येरवडा-६, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अनिल अंबदास मते,<br>रा. वडीकाळ्या, पो. सुखापुरी, तालुका अंबड,<br>जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा समादेशक होमगार्डस, जिल्हा समादेशक कार्यालय, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा समादेशक होमगार्डस, जिल्हा समादेशक कार्यालय, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा समादेशकांचे प्रशासकीय अधिकारी, होमगार्डस, जालना - श्री. एस. आर. बर्डे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, जालना (जिल्हा समादेशक होमगार्डस, जालना) | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. टी. बी. मोहिते | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - श्री. व्ही. के. भोसले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १०-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | २४-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०७-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०४-१२-२००९<br>फेरसादर दिनांक<br>११-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व दोन त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या दोन त्रयस्थ पक्षाबद्दलच्या माहितीकरिता प्रतीपृष्ठ दोन रुपये याप्रमाणे एकूण रुपये १२ जमा केल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे अपिलार्थीस दिनांक २४-०८-२००९ रोजी कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-११-२००९ रोजीच्या पत्रान्वये १७ पृष्ठांची माहिती दिल्याचे कागदपत्रावरुन आढळून येत आहे व तसे सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत करण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीने प्रथम अपिलात त्यांना माहिती मिळाली असून ती अपूर्ण, अर्धवट व चुकीची मिळाली आहे असे मोघम नमूद केले आहे तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल अंबदास मते, रा. वडीकाळ्या, पो. सुखापुरी, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समादेशकांचे प्रशासकीय अधिकारी, होमगार्डस, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समादेशक होमगार्डस, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिध्दीकी,<br>राजधानी हॉटेलच्या पाठीमागे, न्यू बसस्टँण्ड रोड,<br>परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. ईकबाल हुसेन जमील हुसेन | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-१०-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-११-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०३-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०६-२००९<br>फेरसादर दिनांक<br>१८-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांनी दिनांक २०-१०-२००८ रोजी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक १२-०३-२००९ रोजी निर्णय दिला आहे. निर्णयावरुन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना तेरा दिवस उशिराने दिली आहे असे दिसून येत आहे. अपिलार्थीस तेरा दिवस उशिराने माहिती मिळाली आहे व यासंबंधात संबंधित आरेखक यांना मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांना समज द्यावी लागेल व भविष्यात दक्ष राहण्याबाबत कळवावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिध्दीकी, राजधानी हॉटेलच्या पाठीमागे, न्यू बसस्टँण्ड रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पंडित तात्याराव सुरनर, : अपीलकर्ता

पोलीस हवालदार ७९२, आर. के. पान सेंटर, स्टेशन चौक, अंबड रोड, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

पोलीस अधीक्षक कार्यालय (रेल्वे), रेल्वे पोलीस मुख्यालय, अजनी, नागपूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय (रेल्वे), अजनी, नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पंडित तात्याराव सुरनर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक, लोहमार्ग, अजनी, नागपूर<br>- श्री. वाय. के. चौधरी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, अजनी, नागपूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, लोहमार्ग, अजनी, नागपूर यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्या खात्यामधील कर्मचारी असून त्यांनी सन २००८ या कालावधीतील आस्थापनाविषयक बाबीसंदर्भात "प्रश्न" विचारले आहेत माहिती या व्याख्येत ते बसत नाही. त्यामुळे ही माहिती देय होत नाही. त्याचप्रमाणे त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केल्याचे दिसून येत नाही त्यामुळे प्रथम अपिलावर सुनावणी झालेली नाही. आयोगाने विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरचे पोलीस अधीक्षक कार्यालय, लोहमार्ग, नागपूर हे महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली येते. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, अजनी, नागपूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, अजनी, नागपूर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, अजनी, नागपूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंडित तात्याराव सुरनर, पोलीस हवालदार ७९२, आर. के. पान सेंटर, स्टेशन चौक, अंबड रोड, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, लोहमार्ग, अजनी, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, अजनी, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपीलकर्ता

पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गजानन संतुकराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना<br>- श्री. पंढरीनाथ गंगाधर खडेकर | : | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १, जालना - श्री. पुरुषोत्तम गोविंदराव भागवत | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. जायभाये भिवाजी बापुराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०६-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०९-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १६-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये ०१ एप्रिल २००८ ते दिनांक १६-०५-२००९ पर्यंतची बदनापूर सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयामधील दोन अभियंत्यांनी केलेल्या कामांची माहिती मागितली असून त्यात कामांच्या आदेशाच्या प्रती, मोजमाप पुस्तिकांच्या सत्यप्रती, देयकाची स्थळप्रत, मंजूर अंदाजपत्रकाच्या सत्यप्रती अशी विस्तृत माहिती मागितली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी केलेल्या कामांची यादी मागितली आहे. माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०८-२००९ रोजी माहिती पाहण्यास उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती पूर्वी पोस्टाने पाठविली आहे परंतु ती अपिलार्थीस मिळालेली नाही. यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, इतर मुद्दयांवरील एकूण ७९ पृष्ठांची माहिती उपलब्ध असून आज रोजी ते ती अपिलार्थीस देऊ शकतात. त्याप्रमाणे ती अपिलार्थीस द्यावी असे आयोगाने आदेशित केले. तसेच उर्वरीत माहितीबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या उर्वरीत माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख, पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भरत गणपतराव मानकर, : अपीलकर्ता
विद्युतनगर, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना<br>- श्रीमती ऐश्वर्या के. काळुशे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा दिनांक ०९-०९-२००९ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २३-०९-२००९ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची नक्कल अपिलार्थीस दिनांक २६-१०-२००९ रोजी नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १६-११-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला आहे. या निर्णयामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात आलेली आहे त्यामुळे अपील फेटाळण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भरत गणपतराव मानकर, विद्युतनगर, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख खलिक शेख अहेमद कुरेशी, : अपीलकर्ता
मु. पो. परतूर, कुरेशी गल्ली, वॉर्ड नं. ५, परतूर,
तालुका परतूर, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर,
जिल्हा जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर,<br>जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत त्यामुळे आयोगास प्रकरणात सद्यस्थिती अवगत होऊ शकत नाही. तथापि आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २३-१०-२००९ रोजी निर्णय निर्गमीत केला आहे की, अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत असून त्यांना आवश्यक असलेली माहिती

सात दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आतापर्यंत माहिती दिली नसल्यास आयोगाचे आदेश प्राप्त होताच त्यांना तात्काळ द्यावी लागेल. माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी यांना त्यात काही त्रुटी आढळून आल्यास त्यांना पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल. यावर जन माहिती अधिकारी यांना त्यानुसार पुढील पंधरा दिवसाच्या आत माहितीच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस यापूर्वी माहिती दिली नसल्यास ती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख खलिक शेख अहेमद कुरेशी, मु. पो. परतूर, कुरेशी गल्ली, वॉर्ड नं. ५, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिशिर विश्वासराव साने, : अपीलकर्ता

अफसर मंजील, ब्लॉक नं. १, जुने तार ऑफिस मागे, पिवळा बंगला, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

प्राचार्य, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगांव, भुसावळ रोड, जळगांव

जन अपिलीय अधिकारी तथा :

अध्यक्ष, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ बीएस्सी नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगांव, भुसावळ रोड, जळगांव

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शिशिर विश्वासराव साने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगांव, भुसावळ रोड, जळगांव - तर्फे श्रीमती मिनाक्षी संगीत, ॲडव्होकेट | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ बीएस्सी नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगांव, भुसावळ रोड, जळगांव | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-१०-२००९ |

फेरसादर दिनांक
२१-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्रीमती मिनाक्षी संगीत, ॲडव्होकेट उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांची कन्या प्रियंका यांच्या बेसिक बीएसस्सी नर्सिंग प्रवेशाकरिता रुपये २०,००० संस्थेस भरणा केले व तदनंतर महाविद्यालय सुरु होण्यापूर्वी प्रवेश रद्द केल्यामुळे त्यांना रुपये २०,००० देय आहेत ते अद्याप मिळाले नाही याबाबतची माहिती त्यांनी मागितली आहे. त्यांच्या कन्येचे इतर कागदपत्र प्राप्त झाले आहेत तथापि रुपये २०,००० मिळालेले नाही यासंदर्भात एकंदर आठ मुद्दयांवर त्यांनी माहिती मागितली आहे.

सुनावणीच्या वेळी संस्थेच्या अभिवक्ता श्रीमती मिनाक्षी संगीत यांनी आयोगास अवगत केले की, सदरची संस्था ही विना अनुदानीत आहे. शासनाकडून यांना कोणताही निधी किंवा मदत मिळत नाही त्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही व त्यामुळे माहिती देय होत नाही.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व उपलब्ध कागदपत्रे पहाण्यात आली व आयोगाचे असे मत आहे की, संस्थेच्या अभिवक्त्यांनी सांगितल्याप्रमाणे संस्थेला शासनातर्फे कोणत्याही प्रकारची मदत किंवा निधी मिळालेला नाही याची खातरजमा करावी लागेल. त्याप्रमाणे महाविद्यालय सुरु करण्याकरिता शासनाकडून जमीन मिळाली आहे का याचा विचार करावा लागेल व त्याची पडताळणी करावी लागेल. या प्रकरणात नर्सिंग महाविद्यालयासंदर्भात शासनाकडील संचालक यांची साक्ष आयोगास आवश्यक वाटत आहे याकरिता संचालक यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता या अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, उपसंचालक (आरोग्यसेवा) व तसेच संचालक (आरोग्यसेवा) यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, उपसंचालक (आरोग्यसेवा) व तसेच संचालक (आरोग्यसेवा) यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

प्रत,

१. श्री. शिशिर विश्वासराव साने, अफसर मंजील, ब्लॉक नं. १, जुने तार ऑफिस मागे, पिवळा बंगला, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगांव, भुसावळ रोड, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, गोदावरी फाऊंडेशन, कॉलेज ऑफ बीएस्सी नर्सिंग, डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, रा. म. ६, साकेगांव, भुसावळ रोड, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उप संचालक (आरोग्यसेवा) नाशिक मंडळ नाशिक, जिल्हा रुग्णालय आवार, त्र्यंबक रोड, नाशिक - ४२२ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. संचालक (आरोग्यसेवा) आरोग्यभवन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सायस नारायणराव मुंढे,<br>रा.अहमदपूर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी,उदगीर, जि.लातूर- श्री. एस.ई.अडकुणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या पत्राच्या सत्यप्रती अपिलार्थीस देण्यात आल्या आहेत. तथापि अर्जावर केलेली कार्यवाही प्रगतीपथावर असल्यामुळे ती देता आली नाही. तसेच अपिलार्थी यांना दि. ३०.०७.२००९ रोजी सत्यप्रतीकरिता

`१०/- व पोस्टाचा खर्च `२५/- असा एकूण `३५/- चलनाने भरणा करण्याचे कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलार्थीने शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, संबंधित प्रकरण त्यावेळी न्यायप्रविष्ट होते व न्यायालयाने आदेश दिल्याप्रमाणे सदर प्रकरणासंदर्भात उपविभागीय कार्यालयाच्या स्तरावर सुनावणी प्रक्रिया सुरु आहे. अपिलार्थी यांनी कार्यवाहीची/चौकशी अहवालाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांना सद्यपरिस्थिती अपिलार्थीस कळवावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे स्तरावर प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सायस नारायणराव मुंढे, बँक कॉलनी, अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राज क्षिरसागर, : अपीलकर्ता
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अंध अपंग मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण निवासी
विद्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी, :
समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | मुख्याध्यापक, अंध व अपंग मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण निवासी विद्यालय, लातूर -श्रीमती एस.करुणा शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | समाजकल्याण अधिकारी, जि.प.लातूर - प्रतिनिधी - श्री. प्रशांत वैद्य, सहायक सल्लागार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. मुख्याध्यापक, अंध व अपंग मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण निवासी विद्यालय, लातूर व समाज कल्याण अधिकारी, जि.प.लातूर यांचे प्रतिनिधी सहायक सल्लागार उपस्थित आहेत.

मुख्याध्यापक, अंध व अपंग मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण निवासी विद्यालय, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांचे विद्यालय, अंध व अपंग मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण निवासी विद्यालय, लातूर ही संस्था कायम स्वरुपी विनाअनुदानित असून शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही तसेच त्यांची शाळा भाडयाच्या इमारतीमध्ये सुरु आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेत त्यांच्या शाळेचा समावेश होत नाही. अपिलार्थी यांनी सन २००६ ते २००९ या तीन वर्षांची या शाळेविषयीची विस्तृत माहिती मागितली आहे, ती त्यांना देय होत नाही. समाज कल्याण अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांचे दि. २८.०३.२०११ रोजीचे पत्र आयोगास सादर करुन आयोगास अवगत केले की, सदर शाळेस आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांची मान्यता मिळालेली आहे तथापि या शाळेस शासनाचे कोणतेही वित्तीय सहाय्य मिळत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३०-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राज क्षिरसागर, सिध्दार्थ हौसिंग सोसायटी, रोड नं. १५, लातूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अंध व अपंग मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण निवासी विद्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विठ्ठल निवृत्तीराव जाधव, : अपीलकर्ता
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर रचनाकार,
नगर रचनाकार कार्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी, :
नगर रचनाकार,
नगर रचनाकार कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - (१)नगर रचनाकार, लातूर - श्री. व्ही.पी.पाटील | : | उपस्थित |
| | जन माहिती अधिकारी -(२) नगर रचनाकार, नगर परिषद,लातूर - श्री. ए.व्ही. कस्तुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - (सध्याचे) उपसंचालक, नगर रचनाकार,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद - श्री. ए.वाय वघळे | : | उपस्थित |
| | (तत्कालीन) )उपसंचालक, नगर रचनाकार,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद - श्री. ए.सी. मुंजे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.०१.२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५.०३.२००९
(फेरसादर दि.०५.११.२००९)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित (सध्याचे व तत्कालीन) आहेत.

जन माहिती अधिकारी (१) यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्ज हा नगर परिषद, लातूरशी संबंधित असल्यामुळे नगर परिषद, लातूर यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद यांच्याकडे दि. २४.१०.२००८ रोजी पाठविण्यात आला. त्यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती दि. २०.१२.२००८ रोजी विनामूल्य दिलेली आहे. अपिलार्थी यांनी प्रथम अपील नगर रचनाकार, लातूर यांच्याकडे दि. १७.१२.२००८ रोजी दाखल केले व तो अर्ज जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना यांच्याकडे दि. १९.१२.२००८ च्या पत्रान्वये वर्ग केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रथम अपिलावर दि. १४.०१.२००९ रोजी सुनावणी घेतलेली आहे. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. निर्णय दि. १७.०१.२००९ रोजी दिला असून त्यात नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिलेली आहे, हे स्पष्ट होत आहे, म्हणून प्रथम अपील निकाली काढले आहे.अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी दिलेली माहिती अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असे मोघम स्वरुपात नमूद केले आहे. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी वाटते, याबाबत हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल. तदनंतर पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती पाठवावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे स्तरावर प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल निवृत्तीराव जाधव, वृंदावन, अश्वमेघ हॉटेलच्या पाठीमागे, श्रीकृष्ण मंदिर जवळ, श्रीनगर, लातूर, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचनाकार,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सूर्यवंशी श्रीनंद संग्राम,<br>रा.आंबेगाव,ता.देवणी, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी कार्यालय,जिल्हा परिषद,लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी कार्यालय,जिल्हा परिषद,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष- मुख्याध्यापक, भोगेश्वर विद्यालय,दवणहिप्परगा | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी भोगेश्वर विद्यालयाच्या दवणहिप्परगा, ता.देवणी जि.लातूर या शाळेसंदर्भात काही मुद्यांवर माहिती मागितली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांना माहिती मिळाली किंवा कसे याबाबत आयोगास अवगत होऊ शकत नाही. तथापि मुख्याध्यापक, भोगेश्वर विद्यालय, दवणहिप्परगा,ता.देवणी, जि.लातूर यांनी दि. २३.०९.२००९ रोजीचे अपिलार्थीस लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये मुख्याध्यापक यांनी नमूद केले आहे की, शिक्षणाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, लातूर येथे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी दि. १४.०९.२००९ व १८.०९.२००९ रोजी प्रयत्न करण्यात आला. तथापि अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे देता आली नाही. सदरची माहिती ४३ पृष्ठांची असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये कोणत्या पध्दतीने माहिती हवी आहे, असे नमूद केलेले नव्हते. तरी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे की, त्यांच्या कार्यालयातून घेऊन जावी व कोणत्या पध्दतीने माहिती हवी आहे, त्याबाबत कळवावे. या सर्व बाबींवरुन माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे, असे आढळून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेऊन आयोगाचे अभिप्राय असे आहेत की, अपिलार्थी यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून माहिती हस्तगत करावी लागेल. सदरचे प्रकरण आयोगाच्या स्तरावर बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३०-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यवंशी श्रीनंद संग्रामराव, मु. आंबेगाव, पो.गुरनाळ, ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी कार्यालय,माध्यमिक विभाग,जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, शिक्षणाधिकारी कार्यालय,माध्यमिक विभाग,जिल्हा

परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. किरण माणिकराव यादव<br>रा. तुळजापूर, जि. उस्मानाबाद. | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>पुरवठा अधिकारी (नायब तहसीलदार),<br>तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पुरवठा तपासणी अधिकारी, तहसील कार्यालय,तुळजापूर,जि. उस्मानाबाद- श्री. आर.ए.जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी मागितलेली माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ `२/- याप्रमाणे एकूण `४८०/-तुळजापूर शाखेच्या स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मध्ये जमा करुन चलनाची प्रत सादर करुन अपेक्षिलेली माहिती घेऊन जाण्याकरिता दि. १२.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थी यांनी सदरच्या शुल्काचा भरणा केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी एकूण चार त्रयस्थ पक्ष - स्वस्तधान्य दुकानदारांसंबंधी माहिती मागितली आहे व माहितीचा कालावधी दि. ०१.०१.२००८ ते ऑगस्ट, २००९ असा विस्तृत स्वरुपाचा आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पाहणी करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आली व चारही स्वस्त धान्य दुकानदाराबाबत माहितीची पाहणी केल्याबाबतची पोच अपिलार्थी यांनी दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. आयोगासमोर केलेला युक्तिवाद व सादर केलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, रा.आराधवाडी, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा पुरवठा तपासणी अधिकारी, तहसील कार्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पाटील मधुकर पंडितराव,<br>रा. रोसा, ता.परंडा, जि.उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी वीस टन लोखंड चोरीबाबत दि. ०१.११.२००३ रोजी केलेला अर्ज व इतर माहितीबाबत एकूण चार मुद्यांद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम

अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १४.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे. सोबत संदर्भासाठी मूळ अर्ज, प्रथम व द्वितीय अपिलाची प्रत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०४.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पाटील मधुकर पंडितराव,रा. रोसा, ता.परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, : अपीलकर्ता
रा.सताळा खु. ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२१० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

प्रकरणात दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास गरजेचे वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, मु.पो.सताळा (खुर्द) ता.अहमदपूर, जि.लातूर -४१३ ५२३.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बेलुरे शिवराज मलिकार्जुन,<br>रा.संघाचीवाडी, ता.चाकूर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,चाकूर,<br>जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसील कार्यालय,चाकूर,जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, चाकूर,जि.लातूर - श्री. जे.एस.निरंजन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, चाकूर, जि.लातूर - डॉ. प्रशांत पडघन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०१.०७.२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली काही माहिती दि. ०५.०८.२००९

रोजी अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्याची पोचही दिलेली आहे व तशी नोंदही त्यांच्या दप्तरी आहे.अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ०३.०९.२००९ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस माहिती पुरविण्यात यावी व त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडे दि. ०९.०९.२००९ रोजी तलाठी यांच्यामार्फत माहिती पाठविली तथापि त्यांनी ती स्वीकारण्यास इन्कार केला.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे निदेश असे आहेत की, अपिलार्थीस माहिती मिळण्यासाठी पुन्हा एक संधी देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपिलार्थीस द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३०-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बेलुरे शिवराज मलीकार्जुन, रा. संघचीवाडी, पो.शेळगाव,ता.चाकुर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दशरथ आच्युतराव होळे,<br>रा. अष्टामोड, ता.चाकूर,जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, उदगीर, जि.लातूर - श्री. एस.ई. अडकुने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०६.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी, उदगीर कार्यालयातील दस्तऐवजाची सन १९९० ते २००९ या मोठया कालावधीची विस्तृत स्वरुपाची एकंदर ११ मुद्यांद्वारे नक्कल मागितली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून

त्यामध्ये अपेक्षित माहितीचा/ प्रकरणाचा निश्चित उल्लेख केलेला नाही, त्यामुळे नेमक्या कोणत्या दस्तऐवजाच्या प्रती अपिलार्थीस द्यावयाच्या आहेत, यास अडचण होत आहे. म्हणून त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखांची पाहणी करावी, असे दि. १६.०६.२००९ रोजी कळविले आहे.जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०७.२००९ रोजी निर्णय दिला आहे की,अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी, उदगीर यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित राहून संचिकेची पाहणी करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावी. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची कलम ७(९) अन्वये मागितलेल्या माहितीची पाहणी करण्यासाठी अभिलेखे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय आयोगास योग्य वाटतो.

या सर्व बाबी विचारात घेता विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दशरथ अच्युतराव होळे, रा.अष्टामोड, ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दत्तात्रय नवलू फड,<br>रा.अष्टामोड, ता.चाकूर,जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर - श्रीमती के. पी. रायचुरकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता `३४/-(एकूण १७ पृष्ठांकरिता) इतक्या शुल्काचा भरणा करण्यात यावा, असे दि. २१.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळवून त्याद्वारे लेखाशीर्ष इत्यादीचा तपशीलही देण्यात आला आहे. अपिलार्थी यांनी त्याप्रमाणे `३४/-इतक्या रकमेचा भरणा

केलेला आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १७.०६.२००९ ( जो जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २५.०६.२००९ रोजी प्राप्त झाला) रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती दि. २९.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १५.०९.२००९ रोजी निर्णय दिला आहे की, नायब तहसीलदार यांनी सादर केलेली माहिती यासोबत देऊन सर्व संबंधितांना कळवून संचिका बंद करण्यात येऊन अभिलेख कक्षात वर्ग करण्यात यावी. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मूळ अर्जासंदर्भात काही माहिती अपूर्ण असेल किंवा त्यामध्ये काही त्रूटी असतील तर त्याबाबत जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांचे आत कळवावे लागेल व तदनंतर पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना त्यासंदर्भात पूर्तता करावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे स्तरावर सदरचे अपील प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय नवलू फड, मु. हाकनाकवाडी, पो. सोमनाथपूर, ता.उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मनोहर चिमाजी चाळक,<br>संजयनगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, गेवराई, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मनोहर चिमाजी चाळक | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय, गेवराई, जिल्हा बीड - श्री. के. एच. जगरवाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये इंदिरा गांधी योजनेबाबत दिनांक ०१-०१-२००५ पासून दिनांक २६-०२-२००९ पर्यंत एकूण ९ मुद्दयांवर विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०८-२०१० रोजी लाभार्थ्यांची माहिती

व दिनांक ३१-०८-२०१० रोजी उर्वरीत माहिती दिली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी पुढे सांगितले की, दिनांक १८-०३-२०११ रोजी अपिलार्थीस कार्यालयात उपस्थित राहून पाहणी करण्याचे कळविले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाली.

आयोगाच्या असे दृष्टोत्पत्तीस आले आहे की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना चार वर्षाची विस्तृत अशी ९ मुद्दयांवर माहिती मागितली आहे व ती माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिलार्थीस देय आहे. तथापि माहिती विस्तृत असल्याकारणाने जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (सं.गा.यो.), तहसील कार्यालय, गेवराई यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन देणे योग्य होईल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. या सर्व बाबी तहसीलदार, गेवराई, जिल्हा बीड श्री. व्ही. एन. देशमुख यांना व्यक्तिशः पहाव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (सं.गा.यो.), तहसील कार्यालय, गेवराई यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३०-०३-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोहर चिमाजी चाळक, संजयनगर, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रामकिशन संतराम गर्जे,<br>पंचशिल नगर, गित्ते निवास, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, सेवा सहकारी सोसायटी मर्या. अंबलवाडी,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०३-२०११ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०२.०६.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन २००८-२००९ या कालावधीची इंदिरा विद्यालय,लालवाडी,नांदेड या शाळेशी संबंधीत तीन मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.नांदेड यांनी माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे प्रकरण निकाली काढून यासंदर्भात दि.०२.०६.२००९

रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसून येत आहे. तथापि या प्रश्नार्थक माहितीचे सुलभीकरण केल्यास अपिलार्थीस खालीलप्रमाणे माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे.

१) इंदिरा विद्यालय,लालवाडी,नांदेड या शाळेस प्राप्त झालेल्या शासन मान्यतेची प्रत.

२) शाळेच्या व्यवस्थापन समितीतील पदाधिकाऱ्यांची पदनामांसह नावांचा उल्लेख केलेले कागदपत्र (संस्थेच्या नावाचे लेटरहेड इ.)

३) शाळेच्या मुख्याध्यापकाचे नाव व एकूण कर्मचाऱ्यांची संख्या.

ही माहिती अपिलार्थीस या शाळेस जर कोणत्याही प्रकारे शासनाचे वित्तीय सहाय्य मिळत नसेल तर अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे ही माहिती देय होणार नाही, अन्यथा ही माहिती जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.नांदेड यांना द्यावी लागेल.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात संपूर्ण माहिती अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्याम बाबुराव निलंगेकर, रा. लालवाडी, पो.शिवाजीनगर,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कदम विलास समर्थराव, : अपीलकर्ता
रा. मुखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२३१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.१०.२००९ ( पुणे कार्यालयास प्राप्त) |
| | | दि. ३०.११.२००९ (औ.बाद कार्यालयास प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ३१-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कदम विलास समर्थराव, तगलाईन गल्ली, झेंडा चौक, मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जाधव सुधाकर तुकाराम, | : | अपीलकर्ता |
| रा. बाळापूर, ता.धर्माबाद, जि.नांदेड | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, धर्माबाद, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, धर्माबाद, जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), धर्माबाद, जि.नांदेड- श्री. मत्तावर व्ही. एच. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, धर्माबाद, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी धर्माबाद तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानाबाबत माहे सप्टेंबर,२००८ ते जून,२००९ या कालावधीची सर्व योजनानिहाय विविध सहा मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे.त्यामुळे ही माहिती संकलीत करण्यास वेळ लागला. आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस

हस्तांतरित करण्यासाठी एकूण ७५ पृष्ठांची माहिती उपलब्ध आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव सुधाकर तुकाराम, सिध्दार्थनगर, बाळापूर, ता.धर्माबाद, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे, : अपीलकर्ता
लोण खुर्द, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत.

सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत याची आयोग गंभीर नोंद घेत आहे. भविष्यात आयोगापुढील सुनावणीस त्यांना व्यक्तिशः उपस्थित रहावे लागेल याची त्यांनी दक्षता घेणे आवश्यक राहील.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०४-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळालेली नाही तथापि तलाठी तथा जन माहिती अधिकारी तलाठी सजा धनज यांनी फेरफाराच्या नकला दिल्या आहेत तथापि फेरफार ज्या आधारे केला आहे ती कागदपत्रे उपलब्ध नसून ती चार्जमध्ये त्यांना प्राप्त झालेली नाहीत असे दिनांक २४-०५-२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविल्याचे कागदपत्रावरुन दिसून येत आहे, ही बाब आयोगास गंभीर वाटते. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या प्रकरणात संपूर्ण चौकशी करावी लागेल व कागदपत्रांचा शोध घेऊन ती अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल. त्याचप्रमाणे कागदपत्रे गहाळ झ ाली असतील तर संबंधितांविरुध्द महाराष्ट्र अभिलेखे अधिनियम २००५ नुसार कार्यवाही करावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जिल्हाधिकारी, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे, लोण खुर्द, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोतीराम गयबू काळे,<br>मु. जानापुरी, पो. वडेपुरी, S.R.T. तालुका लोहा,<br>जिल्हा नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत याची आयोग गंभीर नोंद घेत आहे. भविष्यात आयोगापुढील सुनावणीस त्यांना व्यक्तिशः उपस्थित रहावे लागेल याची त्यांनी दक्षता घेणे आवश्यक राहील.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा दिनांक २७-०५-२००९ रोजीचा अर्ज त्यांच्या दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांच्याकडे वर्ग केलेला आहे. त्यामुळे प्रकरणात प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नांदेड हे जन माहिती अधिकारी होतात.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २७-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या प्रथम अपील सुनावणीवरील निर्णयाची प्रत आयोगापुढे उपलब्ध नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या अर्जान्वये सन २००१ ते २००६ या कालावधी-ची विस्तृत माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, S.R.T. तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मण नागोराव येताळे (बाभळीकर), : अपीलकर्ता
रा. बाभळी (ध), पो. मंगनाळी, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२२७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत याची आयोग गंभीर नोंद घेत आहे. भविष्यात आयोगापुढील सुनावणीस त्यांना व्यक्तिश: उपस्थित रहावे लागेल याची त्यांना दक्षता घेणे आवश्यक राहील.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २५-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस मिळाल्याचे आढळून येत नाही. जन

अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस आठ दिवसात माहिती पुरविण्यात यावी असा निर्णय दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण नागोराव येताळे (बाभळीकर), रा. बाभळी (ध), पो. मंगनाळी, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालासाहेब सुखदेव सोनवणे, : अपीलकर्ता
भोसले निवास, विवेकानंद नगर, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२१८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बालासाहेब सुखदेव सोनवणे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव,<br>जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०९-२००९<br>फेरसादर दिनांक<br>३१-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत.

सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत याची आयोग गंभीर नोंद घेत आहे. भविष्यात आयोगापुढील सुनावणीस त्यांना व्यक्तिशः उपस्थित रहावे लागेल याची त्यांनी दक्षता घेणे आवश्यक राहील.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये सन २००५ ते २००९ पर्यंत विविध निवडणुका जसे लोकसभा, विधानसभा, जिल्हापरिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, मतदारांची यादी इत्यादीसाठी बीड जिल्ह्याकरिता मिळालेल्या अनुदान, झेरॉक्स बाबत दिलेला खर्च इत्यादी विस्तृत तपशीलाची माहिती मागितली आहे जी त्यांना आतापर्यंत प्राप्त झालेला नाही.

अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची व मोठ्या कालावधीची माहिती मागितली आहे त्यातील नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे हे ते स्वेच्छेने सांगू शकल्यास त्याप्रमाणे माहिती मिळणे व्यवहार्य होईल असे आयोगाने सूचित केले असता अपिलार्थीने सांगितले की, सन २००५ ते २००९ या कालावधीत लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत व पुनरिक्षित कार्यक्रम इत्यादीकरिता महाराष्ट्र शासन / भारत सरकार यांच्याकडून एकूण मिळालेले अनुदान व त्यापैकी छायांकीत प्रती काढण्याकरिता मिळालेले अनुदान व छायांकीत प्रती काढण्याकरिता तहसीलदार, माजलगांवतर्फे करण्यात आलेल्या नेमका खर्चाचा तपशील या माहितीची त्यांना आवश्यकता आहे व ती देण्यात यावी असे सुनावणीच्या वेळी स्वेच्छेने सांगितले. ही माहिती अपिलार्थीस देय आहे. अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झालेला आहे त्यामुळे तहसीलदार तथा जन अपिलीय अधिकारी तसेच तहसील कार्यालय प्रमुख यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. या बाबींची पुर्तता होईल व आयोगाच्या आदेशाची पुर्तता होईल ही बाब उपजिल्हाधिकारी (निवडणूक), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना व्यक्तिशः पहावी लागेल.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार जे कार्यालय प्रमुख आहेत त्यांना वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांना उपलब्ध झालेल्या अनुदानाचा व त्यातील झेरॉक्स पोटी मिळालेल्या अनुदानाचा व केलेल्या खर्चाचा तपशील अपिलार्थीस आयोगास आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठवावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आणि अपिलार्थीस देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालासाहेब सुखदेव सोनवणे, भोसले निवास, विवेकानंद नगर, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपजिल्हाधिकारी (निवडणूक), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रशांत नामदेवराव घाडगे,<br>रा. फुलेनगर, गणेशराव जाधव यांचा वाडा, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, तलाठी कार्यालय, सजा मनूर, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, तलाठी कार्यालय, सजा मनूर, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. नामदेव घाडगे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष सर्वजण अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत याची आयोग गंभीर नोंद घेत आहे. भविष्यात आयोगापुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित रहावे लागेल याची त्यांनी दक्षता घेणे आवश्यक राहील.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना आजपर्यंत मिळाली नाही. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल. या प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, सजा मनूर, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग झाला असल्यामुळे ते शास्तीस पात्र ठरत आहे. याकरिता कलम २० (१) च्या परंतुकानुसार संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, सजा मनूर, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, सजा मनूर, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०३-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रशांत नामदेवराव घाडगे, रा. फुलेनगर, गणेशराव जाधव यांचा वाडा, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, सजा मनूर, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. इरफान बागवान नबी बागवान,<br>सय्यद नगर, पांगरी रोड, समीर बिल्डींगच्या मागे, अंगीरा फर्निचर समोर, बीड | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>तहसीलदार, पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, बीड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत याची आयोग गंभीर नोंद घेत आहे. भविष्यात आयोगापुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित रहावे लागेल याची त्यांनी दक्षता घेणे आवश्यक राहील.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १५-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना आजपर्यंत मिळाली नाही. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल. या प्रकरणात जन माहिती अधिकारी, पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, बीड यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग झाला असल्यामुळे ते शास्तीस पात्र ठरत आहे. याकरिता कलम २० (१) च्या परंतुकानुसार संबंधित जन माहिती अधिकारी, पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, बीड यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, बीड यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी, पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, बीड यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, बीड यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. इरफान बागवान नबी बागवान, सय्यद नगर, पांगरी रोड, समीर बिल्डींगच्या मागे, अंगीरा फर्निचर समोर, बीड.

२. जन माहिती अधिकारी, पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गजानन संतुकराव देशमुख,<br>पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत याची आयोग गंभीर नोंद घेत आहे. भविष्यात आयोगापुढील सुनावणीस त्यांना व्यक्तिशः उपस्थित रहावे लागेल याची त्यांनी दक्षता घेणे आवश्यक राहील.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस मिळाल्याचे आढळून येत नाही.

अपिलार्थी यांनी सन २००८-०९ या वर्षाची दोन अधिकारी यांनी केलेल्या कामांची यादी, कार्यारंभ आदेश, बिलाची सी. सी., एम. बी. झेरॉक्स, अंदाजपत्रकाची मूळ रक्कम इत्यादी बाबत सविस्तर माहिती मागितली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती यापूर्वी अपिलार्थीस देण्यात आली नसल्यास जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख, पिंपळगांव (रेणुकाई), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
औरंगाबाद-४३१००१

श्री. गंगाधर दिगंबर बडुरे, : अपीलकर्ता
मु. पो. बरबडा, तालुका नायगांव (खै.),
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धर्माबाद,<br>तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद, तालुका धर्माबाद,<br>जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०४-२००९<br>फेरसादर दिनांक<br>१८-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत याची आयोग गंभीर नोंद घेत

आहे. भविष्यात आयोगापुढील सुनावणीस त्यांना व्यक्तिशः उपस्थित रहावे लागेल याची त्यांनी दक्षता घेणे आवश्यक राहील.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली किंवा नाही याचा तपशील उपलब्ध नाही. अपिलार्थी यांनी गतीमान पाणलोटसंदर्भात ०१ जानेवारी २००६ ते ०१ डिसेंबर २००८ या कालावधीतील मागितली आहे. याकरिता अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती यापूर्वी अपिलार्थीस देण्यात आली नसल्यास जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गंगाधर दिगंबर बडुरे, मु. पो. बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.
२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिनेश भाऊराव मोरे, : अपीलकर्ता
गांधीनगर, नायगांव (बा.), तालुका नायगांव (खै.),
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.),
तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी, :
तहसील कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिनेश भाऊराव मोरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.),<br>तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड<br>- श्री. बी. जी. येवतीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.),<br>तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. वसंत मेडेवार | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. चंद्रकांत नागेश कवटीकवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०७-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-१०-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. चंद्रकांत नागेश कवटीकवार उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. वसंत मेडेवार अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये व्यक्तिशः माहिती मागितली असून ती त्यांना देण्याचा प्रयत्न केला परंतु अपिलार्थी यांनी ती माहिती घेतली नाही.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही. याकरिता आयोगाने जन माहिती अधिकारी यांना सूचित केले की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती याच्या छायांकीत प्रती विनामूल्य नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पाठवाव्यात. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्यावर त्यांना या माहितीमध्ये काही अपूर्ण माहिती आढळून आल्यास त्यानंतर पंधरा दिवसाच्या आत त्यांना जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल. जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या संदर्भाने उर्वरीत माहिती पुरवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली व त्यांना देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनेश भाऊराव मोरे, गांधीनगर, नायगांव (बा.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.),
तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वाघमारे ज्योतिबा शंकर, : अपीलकर्ता
मु. औराळा, पो. सालेगांव, तालुका नायगांव (खै.),
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.),
तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.),
तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२२४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.),<br>तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड श्री. बी. जी. येवतीकर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.),<br>तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. बगुलवाड बळीराम माधवराव | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. बगुलवाड बळीराम माधवराव उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १८-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये सन २००० ते दिनांक १८-०४-२००९ या कालावधीतील माहिती व्यक्तिशः मागितली आहे. ही माहिती संबंधित त्रयस्थ पक्ष स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडून मागण्याचा प्रयत्न करण्यात आला तथापि स्वस्त धान्य दुकानदारा-कडून माहिती प्राप्त झाली नाही कारण त्यांचे रेकॉर्ड चोरीस गेले आहे व याबाबतचा पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. ही बाब जिल्हाधिकारी, नांदेड यांना विचारात घ्यावी लागेल व चौकशी करावी लागेल. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस दिनांक २५-०३-२०११ रोजी व्यक्तिशः देण्यात आली आहे त्याची पोच अपिलार्थीने दिली आहे ती पोच त्यांच्या दप्तरी आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वाघमारे ज्योतिबा शंकर, मु. औराळा, पो. सालेगांव, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.